ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

REVIEW OF RESEARCH

# गोंदिया जिल्हयातील कौटुंबिक कलहास कारणीभूत असलेले घटकांचे अध्ययन



डॉ. कल्पना राऊत
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख ,
एस. जी. बी. महिला महाविद्यालय, तुमसर.


## साराशं

आधुनिक काळात औद्योगिकरण, पश्चिमीकरण, स्त्री शिक्षणाचा प्रसार, स्त्री–पुरूष समानता यामुळे महिलांचा दर्जा पुरूषांच्या बारोबरीचा झाला आहे. परंतु असे असले तरी आजही महिलांना कौटुंबिक अन्याय– अत्याचार, लैंगिक छळ, कौटुंबिक कलह इत्यादी गोष्टींचा सामना करावा लागतो आहे. व्यक्तीवादी व स्वतंत्र विचारसरणीमुळे, पती–पत्नी मधील असामंजस्यामुळे आज कौटुंबिक कलह मोठया प्रमाणात वाढत आहेत. हे कौटुंबिक कलह का निर्माण होतात? त्याची कारणे काय? कौटुंबिक कलह सोडविण्यात महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका काय? इत्यादी प्रश्नांचा शोध घेण्यासाठी प्रस्ततु अध्ययनाची आवश्यकता आहे.


## प्रस्तावना

देशात प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी आणि व्यक्तित्वाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी इतकेच नव्हे तर संपूर्ण विश्वाचा मुळ आधार असणारी कुटूंब व्यवस्थेचे आणि पर्यायाने मानवी जीवनाचे सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, सामजिक, भावनिक अस्तित्व आबाधित राखण्यासाठी कुटुंब कलुष्ठीत करणारे कलहाचे प्रमाण कमी करणे अत्यावश्यक आहे. कौटुंबिक कलहामुळे सतत विमनस्क, अंशात असलेली. स्त्री किंवा पुरूष सुदृढ राष्ट्राची निर्मिती कशी करू शकेल? त्याच्या मनातील बेचैनिचा, अशातंतेचा, दुभंगलेल्या मानसिकतेचा त्यांच्या कार्यावर निश्चितच परिणाम होईल आणि पर्यायाने कामाचा दर्जा खालावत जाईल आणि देशाच्या उत्तरोत्तर आणि उत्तमोत्तम प्रगतीचा मार्ग अविरूद्ध होईल. हया आणि अशा कितीतरी समस्यांवर मात करण्यासाठी किंवा प्रमाण कमी करण्यासाठी महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका महत्वाची सिद्ध होवू शकते.

कौटुंबिक कलहाच्या समस्येच्या व्याप्तीच्या विचार केल्यास गल्लीपासुन नव्हे तर गल्लीतील प्रत्येक घरापासुन तर ते दिल्लीपर्यंत आणि त्याही पुढे या पुथ्वीवरील प्रत्येकच घर हया समस्येच्या भ्रक्षस्थानी असल्याचे निदर्शनास येते. गावातील शेवटच्या घरापासून ते देशातील सर्वात बडया समजल्या जाणा–या परिवारापर्यंत कलहाच्या समस्येचे विचरण असल्याचे सहज लक्षात येते. गरीबातील गरीब माणसांपासून ते गांधी, अंबानी, ठाकरे, मुंडे, अशा विविध क्षेत्राच्या मध्यस्थानी असलेल्या कुटुंबातही कलहाचे प्रमाण आहे. सामान्य माणसाच्या कुटुंबातील कलहामुळे राजकारण, समाजकारण देशाचे अर्थकारण आणि विचारांचे प्रवाहही ढवळून निघतात. आणि त्र्राचे परिणाम पुर्ण देशालाही भोगवे लागतात. याची प्रचिती वेळोवेळी आपल्याला आली आहे. अशा विविध कलहांची कारणे वेगवेगळी असु शकतात. पण

कोणत्याही कलहाचे परिणाम शेवटी वाईटच असतात म्हणून शहरी, ग्रामीण भागातूनच नव्हे तर घरातील प्रत्येक व्यक्तिच्या सर्वांगिण परिस्थितीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. आणि अशा समस्यांचे निवारण करण्यात महिला तक्रार निवारण केंद्राची भुमिका निर्णायक ठरू शकते.

**सारणी क्रमांक १ कौटुंबिक कलहास कारणीभूत असलेले घटक**

| शारीरीक आरोग्य विषयक समस्या | वरंवारीता | टक्केवारी | मानसिक समस्या | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| पतीचे नपुंसकत्व | ०१ | ०.३३% | डोक्यात फरक | ०४ | १.३३% |
| एड्स कॅन्सर, लखवा या सारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त | ०१ | ०.३३% | विवाहबाहय संबंधाचा संशय (संशयवृत्ती) | १३१ | ४३.६७% |
| | | | गैरसमज | १७ | ५.६७% |
| सतत आजारपण | ०३ | ०१% | पती मतीमंद | ०२ | ०.६७% |
| राहणीमान गलीच्छ | ०३ | ०१% | मनोविकार | ०६ | २% |
| वैयक्तीक अस्वच्छता | ०३ | १% | बौद्धिक समस्या | | |
| त्वचारोग | ०२ | ०.६७% | विचारांचा अभाव | २१ | ७% |
| शारीरीक व्यंग | ०२ | ०.६७% | वैचारीक पातळीत भिन्नता | १११ | ३७% |
| धार्मिक समस्या | | | बुद्धीचा उपयोग न करण्याची प्रवृत्ती | ९६ | ३२% |
| अति अध्यात्मीक विचार | – | – | वैचारीक पद्धतीत भिन्नता | १११ | ३७% |
| सन्यास | – | – | दुरदृष्टीचा अभाव | ०९ | ३% |
| धर्माच्या बाबतीत वैचारीक मतभेद | ०७ | २.३३% | नैतिक समस्या | | |
| प्रापंचिक जिवनात रस नसते | ०२ | ०.६७% | अप्रमाणिक मार्गाने पैसा कमविणे | – | – |
| देवघरात जोडे घालून प्रवेश | – | – | खोटे बोलणे | १५ | ५% |
| इतर | | | घरातील संस्कार न पाळणे | २ | ०.६७% |
| पालकांकडून कौटूंबिक विघटनास प्रेरणा | १० | ३.३३% | मोठयांचा आदर न करणे | ८ | २.६७% |
| वास्तविकतेचे भान न राखणे | १३ | ४.३३% | अश्लिल साहित्य वाचणे किंवा पाहणे | २ | ०.६७% |
| अवास्तविक अपेक्षा | ०३ | १% | घरात वर्ज्य असलेल्या पदार्थाचे सेवन | २० | ६.६७% |
| | | | रात्री उशिरापर्यंत मित्रमंडळी सोबत वेळ घालविणे | ४९ | १६.३३% |
| | | | उसनवार पैसे घेणे व वेळेवर परत न करणे | ०९ | ३% |

सारणी क्रमांक २ कौटुंबिक कलहाच्या वाढीस कारणीभूत असलेले घटक

| अ. क्र | घटक वर्ग | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शारीरीक आरोग्य विषयक समस्या | १५ | ५% | २८५ | ९५% | ३०० | १००% |
| २. | मानसिक समस्या | १६० | ५३.३३% | १४० | ४६.६७% | ३०० | १००% |
| ३. | बौद्धिक समस्या | ३०० | १००% | – | – | ३०० | १००% |
| ४. | धार्मिक समस्या | ०९ | ३% | २९१ | ९७% | ३०० | १००% |
| ५. | नैतिक समस्या | १०५ | ३५% | १९५ | ६५% | ३०० | १००% |
| ६. | इतर | २६ | ८.६६% | २७४ | ९१.३३% | ३०० | १००% |

व्यक्ती म्हणजे काया नव्हे मन आणि बुद्धी सुद्धा असते व्यक्तीच्या कलहाचा विचार करतांना हया तिनीहचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे कौटुंबिक कलह होण्यास बरेच घटक कारणीभूत असतात. शारीरीक आरोग्याविषयक समस्या अधिक प्रमाणात गंभीर नाही. वाय हा एक्स पेक्षा कमजारे आहे. त्यामुळे विपरीत परीस्थितीचा परीणाम स्त्री पेक्षा पुरूषांवर अधिक होतो. पुरूषांची घेतली जाणारी अधिक काळजी व स्वत:च्या आरोग्याची हेळसांड हे एक अतिशय दु:खद सत्य आहे. शारीरीक आरोग्य विषयक समस्या जास्त आढळल्या नाहीत.

याचाच अर्थ रंगरूप, काईक निरीक्षणावर आधारीत मुली किंवा कुटूंबिय पळून लग्न करतात. परंतु पूर्ण सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. पुरूषांकडून अधिक केल्या जाणा–या अपेक्षा हया स्त्रीच्या दु:खाचे कारण ठरतात पतीचे नपुंसकत्व, त्वचरोग हया समस्या थोडयाफार प्रमाणात आहेत. चुकीच्या सवयी, सतत खर्रा खाणे, दारू पिणे इत्यादीमुळे आजारपण ही सर्व सामान्य बाब आहे शारीरीक आरोग्य विषयक समस्या हे कारण कलंह होण्यासाठी गंभीर बाब नाही.

बहुतांशी गृहिणी (४३.६७ टक्के) संशय पौशाच्यामुळे ग्रस्त आणि त्रस्त आहे. पुरूषांच्या संशयीवृत्तीमुळे सतत घालूनपालून बोलणे, अपेक्षा करणे, चारीत्र्यावर संशय घेतल्यामुळे स्त्री त्रासून जाते. हयामुळे स्त्रीची मानसिक स्थिरता विचलीत होते. निम्न आर्थिक कुटूंबात स्त्रीपुरूष संबंध थोडे अधिक मोकळे आहेत. संयम टिकाटिपणी या गोष्टीचा फार बाऊ केला जात नाही. त्यामुळे कधीकधी संशयाला थारापण मिळतो. पती–पत्नीशी फार प्रेमाने बोलत नाही तो फक्त बॉस असतो. त्यामुळे कर्तव्य म्हणून हे नाते निभवले जाते. प्रेमाचे असेलच असे नाही. बाकी कारणे अल्प प्रमाणात आहे. डोक्यात फरक पडणे पती मतिमंद असणे व मनोविकारामुळे पती कुटूंबातील स्थान अतिशय नगण्य आहे. हयामुळे पुरूषाची व स्त्रीची सुद्धा अतिशय उपेक्षा होते. एकमेकांला सकारात्मकतेने समजून घेणे अतिशय आवश्यक असते परंतु असे न होता संपर्काचा अभाव, समजून घेण्याचा अभाव, योग्य भाषेचा अभाव, नकारात्मक प्रतिक्रीया नकारात्मक शब्द यामुळे मन दुखावले जावून गैरसमज निर्माण होवून कौटूंबिक कलह विकोपास जातात.

३७ टक्के महिलांच्यामते पती पत्नीच्या वैचारीक पद्धतीत अतिशय भिन्नता आहे. स्त्री ही कुटूंब, मुलांच्या गरजा, कौटुंबिक कर्तव्य हया विषयी सुक्ष्म, विश्लेषणात्मक आणि व्यवहारीक पद्धतीने विचार करतील तर पुरूष हया बाबींकडे फारसे लक्ष देत नाही. त्यामुळे समस्या सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंत वाढून कौटुंबिक कलह विकोपास जातात.

२१ टक्के पतीपत्नी दोघांचीही वैचारीक पातळी वेगवेगळी आढळली. काही बाबतीत बाहेरील क्षेत्रातील माहिती व अनुभवाच्या बाबतीत पुरूषांची वैचारीक पातळी महिलांपेक्षा अधिक

उच्च आढळली कारण अनुभवजन्य ज्ञानाचा उपयोग पुरूष बाहेरील क्षेत्रात करतो तर कौटूंबिक क्षेत्रातील अनुभव, वावर महिलांचा अधिक असल्यामुळे हया क्षेत्रात त्यांची वैचारीक पातळी अनुभवजन्य ज्ञानांमुळे अधिक आढळली. हयामुळे कौटूंबिक कलह होणे स्वाभाविक असते. स्त्रीयांच्या प्रेम, प्रशंसेच्या गरजेला पुरूष त्यामुळे समजून घेत नाही. स्त्री ही उपेक्षित वंचित राहिल्याचे दु:ख भोगत राहते.

जीवनाला उच्च शिखरावर नेण्यासाठी, समायोजनासाठी विचारांची गरज असते. योग्य कृतीला योग्य विचारांची जोड देवून जीवनातील समस्या सोडविता येवू शकतात. या विचारांचा मुळात अभाव आहे. हयामुळे कौटूंबिक कलह होतात असे ७ टक्के महिलांना वाटते. पुरूषांनी कुटूंब समस्या, कर्तव्य, उपाय यावर बारकाईने विचार केल्यास कौटूंबिक कलह सोडविणे सहज शक्य होवू शकते. संसारीक जीवनात बहुदा वेगवेगळया प्रकारची गुंतागुंत आढळते. परंतु ही गुंतागुंत बुद्धीचा उपयोग करून सोडविण्याची प्रवृत्ती मात्र ३२ टक्के कुटूंबात आढळत नाही. कोणत्याही समस्येचे सर्व पैलू समजून त्यावर उपाययोजना केल्यास समस्या सोडविण्याचे मार्ग आपोआपच सापडतील यासाठी दोघांनी मिळून सुसंगत विचाराने समस्या समाधानाच्या निष्कर्षाप्रत जावू शकतात.

जीवन म्हणजे एक खेळ नाही. एक साधना, तपश्चर्या आहे. एक एक पायरी वर चढता जीवनाला उत्कर्षाप्रत नेणे आहे परंतू अदुरदर्शीतेचा प्रभाव बहुसंख्येने लोकांत आढळते. यामुळे दैनंदिन कार्य, अर्थाजन, संस्कार, जीवन पडविणे, दुरदर्शितेचे बीजारोपण करणे या सर्व बाबींवर याचा विपरीत परीणाम होतो. समाजातील प्रतिष्ठा, मुलांचे भविष्य, जीवनातील स्थैर्य म्हणजेच जीवनातील सुयोग्य कर्तव्य पार पाडणे आवश्यक असूनही कार्याला दिशा न मिळाल्यामुळे जीवन भरकटते आणि कौटूंबिक कलह होणे एक स्वाभविक बाब ठरते.

नैतिकता मानवी जीवनाच्या स्थैर्य व उत्कर्षाचा आधार असला तरी मानसातील पशुवृत्ती त्याला अयोग्य दिशेने नेले काळाचा बदल, जागतिकीकरण, दुरदर्शन पैसा झाला मोठा आणि माणूस झाला खोटा व युक्तीप्रमाणे संस्कार, नम्रता, उत्तम साहित्य, आदर्श चरीत्र कथांचे वाचने किवां बघणे, स्मरण, चिंतन हे सगळे कमी झाल्यामुळे अनैतिकतेचे, प्रमाण वाढले आहे. उसने पैसे घेणे, मित्रमंडळी सोबत वेळ, शक्ती, कौशल्य वाया घालविणे, सांसारीक उत्तरदायीत्वाची एकूण उपेक्षा ही कौटूंबिक कलहाचे महत्वाचे कारणे ठरतात. रात्री उशिरापर्यंत दारू पिणे व मित्रमंडळी सोबत वेळ घालविणे सोबतच रात्री अचानक स्वयंपाक करावयास लावणे, अन्न फेकणे इत्यादी सारखी अनैतिक वागणूक, कौटूंबिक कलहास कारणीभूत ठरतात. खोटे बोलू नये. सात्वीक भोजन करणे. हया गोष्टी आजकाल काळाच्या उदरात गडप होत आहे. मुलांवरील संस्कार बिघडत आहे. पालकातील पालकत्वाची जाणीव हरवत चालली आहे. त्यामुळे अनैतिकतेचे बीजारोपण नविन पिढीला आपोआपच होत आहे. धार्मिकता विरूद्ध आधुनिकता हया विरोधाभासामुळे जीवनात भौतिकवाद, वस्तुवाद अधिक वाढलेला आहे. धर्मरक्षीत या युक्तीप्रमाणे काही लोक अधिक धार्मिक काही असांसरीक प्रवृत्तीचे (स्त्री ही मोक्ष प्राप्तीतील बाधा आहे.) असल्यामुळे प्रापंचिक विरूद्ध अप्रापंचिक प्रवृत्तीच्या विरोधाभासामुळे जीवनाचे सुनियोजन असंभव होते व त्यामुळे कौटूंबिक कलह विकोपाला जातात. धार्मिक रीतीरीवाज न पाळणे, टिकाटिपणी करणे यामुळे कौटूंबिक कलह वाढतात.

काळानुसार कौटूंबिक विघटन म्हणजे कौटुंबिक स्वातंत्र्याचा अविष्कार स्वतंत्र कुटूंबात मुलगी सुखात राहते. या संकल्पनेमुळे पालक मुलीला स्वतंत्र राहण्यासाठी प्रेरित करीत राहतात. त्यामुळे मुलगी स्वत:पुरता विचार करून स्वत:ला अधिक असुरक्षित व एकलकोंडी बनविते. तसे पाहिल्यास काय योग्य व काय अयोग्य यांचे कौटूंबिक कानक तयार झोलले नाहीत. त्यामुळे पालक त्यांच्या विचारानुसार मुलींच्या मानसिकतेत अडथळे निर्माण करून कौटूंबिक विघटनाचे कारक (३.३३ टक्के) बनतात. मुलींना माहेरी कष्टाची सवय नसल्यामुळे पालक मुलींना सासरी पाठविणे टाळतात.

विवाह म्हणजे एक जबबादारी दोन कुटूंबाला जोडणार नातं. म्हणजेच दुस-या कुटूंबाची जबाबदारी स्वीकारणे आपोआपच आली परंतु या वास्तविकतेची जाणीव बरेचदा पती-पत्नी दोघांनाही नसते. वास्तविकतेचे भान न राखल्यामुळे ४.३३ टक्के कुटूंबात कलह होतो. एका स्थळी राहून दिसंगत वागणे हे कौटूंबिक कलहाचा एक महत्वाचा नकारात्मक पैलू आहे.

जीवन म्हणजे एक गुलाबपुष्प असले तरी त्याला काटे असतात. विवाह एक गुलाबी पहाट आहे. परंतु जीवन हे एक काटेरी वाट आहे. विवाहाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जात असल्या तरी विवाहाची यथार्थता मात्र पृथ्वीवरच साकार होते. विवाह एक स्वप्न नव्हे ते एक यथार्थ आहे म्हणून अवास्तविक अपेक्षा करून दुःख निर्मिती करण्यापेक्षा अपेक्षा मर्यादित ठेवाव्या आणि योग्यता वाढवावी. अवास्तविक अपेक्षांचे पंख छाटून त्यांना वास्तविक बनिवणे किंवा योग्यता वाढवून अपेक्षा पुर्ती करणे किंवा थोडया अपेक्षा कमी व थोडी योग्यता वाढवून यथार्थ साकार करणे होय. अवास्तविक अपेक्षा केल्या जातात असे १ टक्के गृहिणींचे मत आहे. हे प्रमाण अल्प असले तरी विचारधीन आहे.

निष्कर्ष

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात कमी अधिक प्रमाणात हया किंवा त्या समस्येने प्रत्येकच कुटुंबाची दमछाक होते आहे. लहान मुलांपासून तर ते मोठया वृद्धापर्यंत प्रत्येकालाचा कुटुंबातील कलहाचे परिणाम भोगावे लागत आहेत. यातुन निर्माण होणा-या ताणतणांवाना सामोरे जावे लागत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे कौटुंबिक कलह ही कोणत्याही एका जातीची, समाजाची किंवा विशिष्ट धर्माचीच समस्या नाही तर सर्वच जाती, समाज, समाजातील घटक, सर्वच धर्माचे लोक, गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, विवाहीत-अविवाहीत, इतकेच नव्हे तर सर्व सासांरिक सुखाचा त्या करण्याचा दावा करणा-या तथाकथित बाबा लोकांनाही विविध प्रकारच्या कलहांनी ग्रासले आहे.

## संदर्भग्रंथ सूची

❖ आगलावे, प्रदिप, २००७, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
❖ आगलावे, प्रदिप, २०००, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
❖ आगलावे, प्रदिप, २००३, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
❖ कुळकर्णी प्रा. पी. के., सामान्य समाजशास्त्र. श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
❖ गोऱ्हे डॉ. निलम, कौंटुबिक हिंसा विरोधी कायदा, स्त्री आधार केंद्र, पुणे, २००७
❖ गोऱ्हे डॉ. निलम, अन्यायग्रस्त महिलांची मैत्रीण, स्त्री आधार केंद्र, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९८